। न ही ज्ञानेन सदृश्यं पवित्रमिह विद्यते ।

# दादासाहेब जोतिराम गोडसे आर्टस, कॉमर्स, सायन्स कॉलेज , वडूज



**बी.ए. भाग- ३**

**मराठी विभाग**

**पेपर क्र. १४** मध्ययुगीन मराठी वाड़मयाचा इतिहास

**विषय :** मध्ययुगीन मराठी वाड़मयाचा इतिहास

**विद्यार्थ्यांचे नाव :** अमोल तानाजी काळे

**हजेरी क्र. :** 320

प्रकल्पाचा विषय : मध्ययुगीन मराठी वाड़मयातील बखर वाड़मयाचे परीक्षण

**मार्गदर्शक**

**प्रा. आवळे सर**

**सत्र – ६ वे**

**शैक्षणिक वर्ष** – २०२२-२०२३

Scanned with CamScanner

# सभासदाची बखर

## प्रस्तावना

सभासद बखर छत्रपती शिवाजी महाराजांचे पुत्र छत्रपती राजाराम महाराज यांच्या इच्छेने कृष्णाजी अनंत सभासद यांनी लिहिले आहे . छत्रपती राजारामांसोबत जिंजीला असताना राजारामांच्या आज्ञेनुसार इसवी सन 1697 च्या सुमारास सभासदाने छत्रपती शिवाजी शहाजी भोसले यांच्या चरित्रावर बखर लिहून काढल्या व तसेच अफजलखान वधाबद्दल म्हटले आहे. त्यांनीच अफजल मारीला या बखरी बद्दल शिवजयंतीच्या निमित्ताने असेही सभासद बखर बद्दल आहे.

Scanned with CamScanner

# सभासदाची बखर

मध्ययुगीन भारतातील शिवछत्रपती हे एकमेव असे की, ज्यांच्या हयातीत ते अवतारी पुरुष म्हणून मान्य पावले. कृष्णाजी अनंत सभासद आपल्या बखरीतून अफजल खान व त्याबद्दल म्हटले आहे. त्यांनीच अफजल मारीला हे कर्म मनुष्याचे नव्हे अवतारीच होतात तसे तरीच हे कर्म मनुष्याचे नव्हे अवतारीच होता तरीच हे कर्म केले यश आले असे झाले या बखरीबद्दल शिवजयंतीच्या निमित्ताने ....

गेल्या 100 ते 150 वर्षात शिवचरित्राच्या अभ्यासासाठी विविध प्रकारचे लिखित साधने देशी आणि परदेशी भाषेत उपलब्ध होऊ लागले आहेत. परंतु शिवप्रभूंसारख्या मराठ्यांच्या छत्रपतींच्या जीवनातील ध्येयधोरण, सहकारी सैन्य व्यवस्था, शासन व्यवस्था कौटुंबिक जीवन आणि निवडक रोमांचकाची प्रसंग याची माहिती प्रथम 1697 साली कृष्णाजी अनंत सभासद यांनीच आपल्या बखरीमध्ये दिली म्हणूनच त्र्यंबक शंकर शेजवळकर आपल्या श्री शिवछत्रपती संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना आराखडा व साधने या अभिजात ग्रंथात ठामपणे सांगतात, हिंदू दृष्टीने शिवाजींचे चरित्र चा नावाचे तर शिवभारत वाचावे लागते तसेच शिवाजींचे संपूर्ण चरित्र जाणून घेण्यास सभासदांची बखर वाचावी लागते.

सभासद बखर हा पहिल्या गद्य स्वरूपातील समकालीन शिवचरित्राचे प्रथम प्रकाशन 1981 मध्ये काव्ये इतिहास-संग्रह मासिकात रावबहादूर काशिनाथ नारायण साने यांच्या संपादनातील झालेले पहावयास मिळते. अशी ग. मा. मेहेंदळे यांची नोंद आहे त्यानंतर श.ना. जोशी, वि. स. वाकसकर , स. रा. गाडगीळ, नरहर कुरुंदकर यु. म. पठाण दत्ता भगत या काही अभ्यासकांनी सभासद बखरीचे संपादन केलेले पाहावयास मिळते.

प्रस्तुत लेखकाकडे स.रा. गाडगीळ, नरहर कुंदरकर यांनी संपादित केलेली सभासद विरचित श्री शिवप्रभू चरित्र (1966) ही प्रत उपलब्ध आहे. प्रस्तावना आणि परिशिष्टे पाहून सोडून ही सभासद बखर 113 पृष्ठांमध्ये समाविष्ट आहे. संपादकांनी त्याची छोटी छोटी अशी 124 प्रकरण केली आहेत.

Scanned with CamScanner

छत्रपती राजाराम महाराजांनी आपले पिता छत्रपती शिवाजी महाराज यांची ही यशोगाथा कृष्णाजी अनंत सभासद यांना तुम्ही पुरातन राज्यातील माहित (गार ) लोक आहा तरी, इस्तकाबिरू पासून चरित्र लिहून देणे म्हणोन आज्ञा केली. सभासदांनी आपल्या छोट्या शिवचरित्रात शिवजन्म, शिवाजी महाराजांची बेंगलोर भेट, जुन्नर शटर लुट, राजगड बांधणी, चंद्रराव मोरे, अफजलखानाचा वध, शाहिस्तेखानाची बोटे तोडणे , शिवाजी-संभाजी मतभेद इ. असंख्य प्रसंग आपल्या चित्रमय शैलीत मोजक्या आणि नेमक्या शब्द रचलेली वाचण्यास मिळतात. विशेषत: युद्धप्रसंगी चित्रित करताना सभासदांची लेखणी अधिक रममाण होऊन जाते .

तसेच शिवछत्रपती आणि दगाबाज अफजल खान भेटीत नेमके काय घडले हे सभासद मोजक्या शब्दात पुढील प्रमाणे वर्णन करतो. खानही पुढेही समोर येऊन राजियास भेटला, राजियानी भेटी देताना खानाने राज्याची मुंडी कवटाळून खाकेखाली धराले आणि हाताची पमदाड होती तिचे मेने टाकून कुशीत रजियाचे चालवली. तो अंगात जरीची कुर्ती होती त्यावर घडलेली अंगास लागली नाही हे फेकून राजियांनी डावे हाताचे वाघनख होते तो हात पोटात चालविला. खानाने अंगात झगाच घातला होता. वाघनखाचा मार करीताच कानाची चरबी बाहेर आली. दुसरा हाच उजवी हातची विचव्याचा मारा चालविला. ऐसे दोन वार करून मुंडी आसडून चौयरिया खाली उडी घालीन निघून गेले. खानाने गलबला केला की, मारिले मारिले. दगा दिधला . बेगी यावा असे बोलताच भोयांनी पालखी आणली आणि पालखीत घालून उचलून चालविला.

सभासद बखर शिवजन्माची कोणतीच जन्मतिथी देत नाही. या बखरीमध्ये शिवचरित्र संबंधीच्या घटनांच्या केवळ दोन तारखा मिळतात. त्या घटना म्हणजे एक त्यांचा राज्याभिषेक आणि दुसरी त्यांचा मृत्यू आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आजही समर्थ रामदासांना पुन्हा पुन्हा शिवछत्रपतींच्या गुरुस्थानी व्याजमान करण्याचा जो वर्ण वर्चस्व अहंकारातून दृष्ट प्रयत्न चालू असतो त्या समर्थ रामदासांचे नाव देखील कृष्णाजी अनंत सभासद विरचित बखरीमध्ये वाचावयास मिळत नाही. म्हणूनच त्र्यं. श. शेजवलकरंसारखा सत्यशोधक इतिहासकार सभासदांच्या वस्तूनिष्ठेचा मनःपूर्वक गौरव करतो.

Scanned with CamScanner

# समारोप

विद्यार्थी मित्रांनो या घटकांमध्ये आपण मराठीतील बखर वाङ्मयाचे स्वरूप पाहिले. मराठीतील बखर वाङ्मय स्वरूप हे ऐतिहासिक दृष्ट्या आणि वाङ्मयीनदृष्ट्या ही महत्त्वपूर्ण आहे. यातून मराठ्यांचा इतिहास आपणास ज्ञात होतोच. पण त्याबरोबरच तत्कालीन राजकारण, लढाया, धर्मकारण, समाजकारण यांचाही परिचय होतो. या बखर वाङ्मयातून मराठ्यांच्या राजकीय जीवनाचा फार मोठा पट आपणांसमोर उलगडत जातो. मराठ्यांची अस्मिता , मराठ्यांची शौर्य , त्यांचा प्रामाणिकपणा इत्यादी गुणांची आपणास ओळख पटते. बखर वाङ्मयात खऱ्या अर्थाने मराठी जनमानसाचे प्रतिबिंब पडले आहे. म्हणून ते वाङ्मय आजही अभ्यासनीय झाले आहे.

Scanned with CamScanner